महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२१-२२/२०२१/

दिनांक : १५.११.२०२१.

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवर संस्थांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत..
संदर्भ : महाआयटी, मुंबई यांचेकडून प्राप्त ई-मेल संदेश दिनांक ११.११.२०२१

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज (नविन/नुतनीकरण) सादर करण्याची प्रक्रीया लवकरच सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत संस्थांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क तसेच इतर शुल्क अद्ययावत करण्याकरीता दिनांक ११.११.२०२१ पासून सुरुवात झालेली आहे.

खाजगी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या महाडीबीटी युजर आयडी व पासवर्डचा वापर करून त्यांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताचे मंजूर शिक्षण शुल्क व विकास शुल्क योग्य त्या आवश्यक कागदपत्रांसह अद्ययावत करुन शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे ऑनलाईन पद्धतीने मान्यतेकरीता पाठवायचे आहे.

शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी तसेच सर्व पदविका अभ्यासकमाच्या संस्थांनी त्यांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताचे शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क व विकास शुल्क (शुल्क नियामक प्राधिकरणाचे मान्यतेचे पत्रासह) तसेच सर्व अभ्यासक्रमांच्या (पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी) संस्था संलग्न असलेल्या विद्यापीठ/मंडळ यांचे मान्य परीक्षा शुल्क या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पद्धतीने मान्यतेकरीता पाठवायचे आहे. स्वायत्त संस्थांनी त्यांचे बोर्ड ऑफ गव्हर्नन्सच्या बैठकीतील ठरावासह मंजूर केलेले परीक्षा शुल्काची प्रत संबंधीत प्राचार्य/संचालक यांनी साक्षांकीत करून या विभागीय कार्यालयास हस्तदेय सादर करुन मान्य करुन घ्यावे.

सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, शुल्क अद्ययावत करण्याची ऑनलाईन प्रक्रीया प्राधान्याने करावी.

(डॉ [illegible] जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\MahaDBT 2021-22\Cicular for updation of inst profile_2021-22.docx